राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत आयुष्यमान आरोग्य मंदिर उपकेंद्र आणि आयुष्यमान आरोग्य मंदिर प्राथमिक आरोग्य केंद्राच्या जन आरोग्य समिती संरचनेत बदल करण्याबाबत दि.२३.११.२०२२ रोजीचा शासन निर्णय अधिक्रमीत करुन सुधारित शासन निर्णय निर्गमित करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक आरोग्य विभाग**
**शासन निर्णय क्र.समिती-२०२६/प्र.क्र. ६७/ पा.सु.१ (ई-९५६६३२)**
१० वा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकूल इमारत,
नवीन मंत्रालय, मुंबई ४०० ००१.
दिनांकः- ०५ ऑगस्ट, २०२६

वाचा-

१. शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र.एनएचएम-११२२/प्र.क्र.५४ /आरोग्य-७, दि. २३ नोव्हेबर,२०२२.
२. शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र.एनएचएम-११२४/प्र.क्र.४४७ /आरोग्य-७, दि. १८.फेब्रूवारी, ०२.२०२५
३. या कार्यालयाचा प्रस्ताव क्र. राआसोम/रुकस कक्ष/ जन.आ. स/शुध्दी.पत्र प्रस्ताव /९३५९५- ९३५९८/ २०२५, दि. ०३.११.२०२५
४. शासन पत्र क्र.एनएचएम-११२२/प्र.क्र ५४/आ-७ एनएचएम/सं. क्र.९५६६३२, दि. ०५.०३.२०२६
५. या कार्यालयाचा माहितीचा तपशिल सादर केलेले पत्र क्र. राआसो/ रुकस. कक्ष / जन.आ.स/ १४९८६९- ७१/ २०२६, दि. ११.०३.२०२६
६. मा. अपर सचिव एवं मिशन निर्देशक (रा.स्वा.मि.) , भारत सरकार, नवी दिल्ली यांचे पत्र क्र NHSRC/२५-२६/CP-CPHC/JAS/०५३३, दि. १७/०३/२०२६.
७. मा. अवर सचिव, महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग प्राप्त पत्र क्र.एनएचएम-११२२/प्र.क्र.५४/एनएचएम (ई-९५६६३२),दि.१३/०४/२०२६.
८. सहसंचालक (तांत्रिक) राष्ट्रीय आरोग्य अभियान मुंबई यांचा प्रस्ताव क्र. राआअ/रुकस/ जन.आ.स/ प्रस्ताव/ ९१७०९- ७१२/ २०२६, दि.१७ ०७. २०२६

## प्रस्तावना :-

आयुष्यमान आरोग्य मंदिर उपकेंद्र (AAM- SC) आणि आयुष्यमान आरोग्य मंदिर प्राथमिक आरोग्य केंद्र (AAM-PHC) येथे सर्व समावेशक प्राथमिक आरोग्य सेवा प्रदान करण्यासाठी आरोग्य विषयक निर्धारीत करणारे सामाजिक आणि पर्यावरणात्मक घटक यांच्यासाठी सामुहिक कृतीवर लक्ष केंद्रित करणे, सामाजिक जबाबदारी, सामुहिक प्रतिसादाच्या प्रक्रियेस सहाय्य करणे. यासाठी

राज्यातील सर्व उपकेंद्र व प्राथमिक आरोग्य केंद्राच्या ठिकाणी जन आरोग्य समिती गठीत करुन कार्यान्वित करण्याची कार्यवाही सुरू आहे. त्या अनुषंगाने उपकेंद्र व प्राथमिक आरोग्य केंद्र येथे जन आरोग्य समितीची स्थापना करुन कार्यान्वित करण्यासाठी दि. २३ नोव्हेबर, २०२२ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. सदर शासन निर्णयाच्या अनुषगांने क्षेत्रिय पातळीवर अंमलबजावणी करतांना काही तांत्रिक व प्रशासकीय अडचणी निर्माण झाल्याने जसे, आरोग्य संस्थामध्ये रुग्ण कल्याण समित्या कार्यान्वित असल्याने त्या बरखास्त करुन नव्याने जन आरोग्य समिती गठीत करण्यास धर्मादाय आयुक्त कार्यालयास Changes Report सादर करतेवेळी पूर्वीच्या अशासकीय सदस्य यांची संमती मिळत नाही. आरोग्य संस्थांमधील वैद्यकीय अधिका-यांच्या बदल्या, सेवानिवृत्ती, समिती सदस्य जन आरोग्य समितीच्या बैठकासाठी नियमित उपलब्ध नसणे, बँक खाते बदल करण्यास अडचणी येत असल्याने आयुष्यमान आरोग्य मंदिर उपकेंद्र (AAM- SC) आणि आयुष्यमान आरोग्य मंदिर प्राथमिक आरोग्य केंद्र (AAM-PHC) येथे जन आरोग्य समिती कार्यान्वित न होणे, तसेच केंद्र शासनाकडून दि. १७ मार्च, २०२६ रोजीच्या पत्रात Amendments निर्गमित करण्यात आले आहेत. त्यात केंद्र शासनाने आयुष्यमान आरोग्य मंदिर असे नामकरण करणे, विविध राज्ये व केंद्रशासित प्रदेश यांच्या सोबत विविध आढावा बैठका व चर्चांव्दारे असे निदर्शनास आले आहे की, जन आरोग्य समित्यांची पुनर्रचना व बैठकींची वारंवारीता (Frequency) यामुळे समित्यांची स्थापना व कामकाज चालविण्यास अडचणी येत असल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच राज्याच्या मर्यादा लक्षात घेता, जन आरोग्य समिती मार्गदर्शक तत्वामध्ये सुधारणा करण्यात आल्या आहेत. यामुळे जन आरोग्य समित्यांच्या संरचनेत लवचिकता मिळेल व सदर समित्यांना कामकाज चालविणे प्रभावीपणे सुनिश्चित होईल. सबब, सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत राज्यात यापूर्वी आरोग्यवर्धिनी उपकेंद्र व प्राथमिक आरोग्य केंद्राच्या ठिकाणी जन आरोग्य समितीची स्थापना करुन कार्यान्वित करण्यासाठी दि. २३ नोव्हेबर, २०२२ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. सदर शासन निर्णय अधिक्रमीत करुन सुधारित शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

## शासन निर्णय:-

केंद्र शासनाने आरोग्य सेवांसंबंधी समस्याचे निराकरण करण्यासाठी आयुष्यमान भारत योजने अंतर्गत आरोग्यवर्धिनी कार्यक्रम सुरु केला आहे. प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यक्षेत्रात येणा-या सर्व गरीब जनतेला प्राथमिक स्वरुपाच्या आरोग्य सेवा (प्रतिबंधात्मक, प्रसारक, उपचारात्मक, पुनर्वसनात्मक) तसेच उपशामक (Palliative care), योग विषयक प्रचार व प्रसार, राष्ट्रीय आरोग्य विषयक कार्यक्रम प्रभावीपणे राबविणे, तातडीच्या गरजा स्थानिकस्तरावर पूर्ण करण्यासाठी उपकेंद्र व प्राथमिक आरोग्य केंद्राच्या ठिकाणी आयुष्यमान भारत आरोग्यवर्धिनी केंद्र स्थापन करण्याच्या प्रस्तावित समितीला **"आयुष्यमान भारत जन आरोग्य समिती"** असे नाव देण्यात आले होते. त्यात

सुधारणा करुन आयुष्यमान आरोग्य मंदिर उपकेंद्र (AAM- SC) व आयुष्यमान आरोग्य मंदिर प्राथमिक आरोग्य केंद्र (AAM-PHC) यामध्ये सुधारणा करण्यात येत आहेत.

०२. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वामध्ये जन आरोग्य समितीच्या उद्दिष्टानुसार उपकेंद्र व प्राथमिक आरोग्य केंद्राच्या ठिकाणी "जन आरोग्य समिती"ची स्थापना करावयाची असून त्यासाठी स्वतंत्र कार्यकारणी निश्चित करावयाची आहे. यामध्ये समिती सदस्याची भूमिका, जबाबदा-या निश्चित असून त्याप्रमाणे समितीने आपले कार्य पूर्ण करणे अपेक्षित आहे. या समितीने स्थानिक गरजा व नियोजनाच्या माध्यमातून समितीची बैठक आयोजित करावयाची असून बैठकीत झालेल्या निर्णयाच्या आधारे उपलब्ध असणारा अबंधीत निधीचा योग्य वापर करणे अपेक्षित आहे.

०३. "जन आरोग्य समिती" ही "जिल्हा आरोग्य सोसायटी (District Health Society)" चा एक घटक म्हणून काम पाहिल. त्यासाठी स्वतंत्र धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडे नोंदणी करण्याची आवश्यकता नाही. या समितीमध्ये शासकिय अधिका-यांसह पंचायतराज प्रतिनिधी/स्थानिक नागरी स्वंराज्य संस्था प्रतिनिधी, स्थायी समित्यांचे प्रतिनिधी, या समितीशी संलग्न भूमिकेत राहतील.

०४. आयुष्यमान आरोग्य मंदिर प्राथमिक आरोग्य केंद्राच्या ठिकाणी यापुर्वी "नोंदणीकृत रुग्ण कल्याण समित्या" कार्यान्वित आहेत. अशा ठिकाणी देखील "जन आरोग्य समित्या" स्वतंत्रपणे गठीत करुन कार्यान्वित करण्यात याव्यात.

## (१) जन आरोग्य समितीची उद्दीष्टे:-

१) आरोग्य सेवा सुविधांचे प्रशासकीय व्यवस्थापन व जबाबदा-या, सामाजिक उत्तरदायित्व आणि समुदायाचा सहभाग वाढविण्याकरीता संस्थात्मक व्यासपीठ निर्माण करणे.

२) व्ही.एच.एन.एस.सी समिती सोबत विविध राष्ट्रीय आरोग्य विषयक कार्यक्रम, आरोग्य संवर्धन, सामाजिक पर्यावरणीय निर्धारके यावर कार्य करण्यासाठी आरोग्यवर्धिनी चमूला (गटाला) आवश्यकतेनुसार योग्य सहकार्य करणे.

३) उपलब्ध अबंधीत निधीचा (Untied Fund) योग्य वापर व त्यांचे व्यवस्थापन करणे तसेच आरोग्य यंत्रणेसोबत समन्वय साधण्यास एक छत्र म्हणून कार्य करणे.

४) समुदाय स्तरावरील विविध वयोगटातील रुग्णास उपचार व प्रयोगशालेय चाचण्याच्या सोयीसाठी पाठपूरावा करणे व त्यास प्रोस्ताहन देणे.

५) समुदाय स्तरावर विविधोपचार,पाठपुरावा, सर्व्हेक्षण इ.साठी कार्यक्षेत्रातील संघटित स्वयंसेवक (NSS, NCC, RED CROSS, SCOUTS, YUVA Group) यांचा सहभाग निश्चित करणे.

६) आयुष्यमान आरोग्य मंदिर येथे दाखल होणा-या सर्व कुटुंबांना दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्धता आणि जबाबदारी सुनिश्चित करण्यासाठी तक्रार निवारण यंत्रणा एक व्यासपीठ म्हणून कार्य करणे.

७) ग्रामीण भागात आरोग्य सेवेचा दर्जा उंचावण्यासाठी विविध शासकीय आरोग्य विषयक योजना, सी.एस.आर आणि धर्मादाय संस्था यांच्याकडून देणगीव्दारे निधी न स्विकारता वस्तू स्वरुपात सहित्य प्राप्त करुन घेण्यात यावे.

८) आरोग्य विषयक सुविधेसाठी नियोजन हाती घेण्यास त्या- त्या भागातील ग्रामपंचायतींचा सक्रिय पाठिंबा मिळविणे.

## (२) जन आरोग्य समितीची रचना आणि घटक:-

### (अ) आयुष्यमान आरोग्य मंदिर उपकेंद्रस्तरावरील जन आरोग्य समिती रचना :-

| अ.क्र. | पद | समिति |
|---|---|---|
| १. | चेअरमन/अध्यक्ष | उपकेंद्र कार्यक्षेत्रातील ग्रामपंचायतीचे सरपंच.<br>ग्रामपंचायतीचे आकारमान व जास्तीची लोकसंख्या ज्यामध्ये कार्यक्षेत्राचा विचार केल्यास त्यात विविधता आढळून येते. अशावेळी आयुष्यमान आरोग्य मंदिर उपकेंद्राच्या कार्यक्षेत्रामध्ये एकापेक्षा अधिक विद्यमान सरपंच कार्यरत असल्यास त्यांची अध्यक्ष म्हणून आळीपाळीने (Rotation) निवड करावयाची आहे. पहिल्या दोन वर्षासाठी आरोग्य संस्था कार्यरत असलेल्या गावाच्या मुख्यालयाच्या सरपंचाची निवड या समितीचे अध्यक्ष म्हणून करावी. दरम्यान कार्यक्षेत्रातील इतर ग्रामपंचायतीचे सरपंच हे त्या समितीचे उपाध्यक्ष म्हणून भूमिका बजावतील. तद्नंतर संबधीत उपकेंद्रात समाविष्ट क्षेत्रातील लोकसंख्येनुसार प्राध्यान्य क्रमाने जास्त लोकसंख्या क्षेत्र समाविष्ट असणा-या ग्रामपंचायतीच्या सरपंचाची अध्यक्ष म्हणून क्रमाक्रमाने नियुक्ती करावी. प्रत्येक अध्यक्षाचा कार्यकाल हा किमान २ वर्ष राहील.<br>* निवडणूकी अभावी सरपंच पद रिक्त असल्यास अथवा आदर्श आचारसंहिता कालावधीत सहअध्यक्ष हे अध्यक्ष म्हणून कामकाज पाहतील. |
| २. | उपाध्यक्ष | कार्यक्षेत्रातील इतर ग्रामपंचायतीचे सरपंच . |
| ३. | सहअध्यक्ष | कार्यक्षेत्रातील वैद्यकिय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र . |
| ४. | सदस्य सचिव | समुदाय आरोग्य अधिकारी (CHO)<br>*ज्या उपकेंद्रात समुदाय आरोग्य अधिकारी (CHO) पद रिक्त आहे अथवा पद मंजूर नाही, त्याठिकाणी कार्यरत आरोग्य सेविका सदस्य सचिव म्हणून भुमिका बजावतील. नियमित आरोग्य सेविका पद रिक्त असल्यास कार्यरत कंत्राटी आरोग्य सेविकेची सेवाज्येष्ठतेनुसार नेमणूक करावी. |
| ५. | पदसिध्द सदस्य | |
| अ. | | कार्यक्षेत्रातील ग्राम आरोग्य पोषण पाणीपुरवठा व स्वच्छता समितीचे अध्यक्ष. (सरपंच वगळुन इतर, महिला सदस्य असल्यास प्राधान्य) (एका पेक्षा अधिक VHNSC अध्यक्ष असल्यास नियमाप्रमाणे किमान दोन वर्ष आळीपाळीने (फिरता क्रम) म्हणून सदस्य पदावर राहता येईल). |
| ब. | | आशा कार्यकर्ती किंवा ग्राम आरोग्य पोषण पाणीपुरवठा स्वच्छता समितीचे सदस्य सचिव. |
| क. | | उपकेंद्रातील कार्यरत सर्व बहुउद्देशीय (MPW/ANM) आरोग्य कर्मचारी (पुरुष आणि महिला) |
| ६. | इतर सर्वसामान्य सदस्य - | |
| ख . | | ग्रामपंचायतीने नामनिर्देशित केलेले कार्यक्षेत्रातील महिला बचत गट/अध्यक्ष महिला बचत गट. |
| ग. | | शालेय आरोग्य दूत/आयुष्यमान भारत शालेय आरोग्य कार्यक्रमातील एक शिक्षक |

| | | |
|---|---|---|
| | विशेष निमंत्रित- | प्रतिनिधी. |
| घ . | | Peer Educator जे RKSK कार्यक्रम अंतर्गत नेमणूक केले जातात, त्यापैकी प्रत्येक गावातील १ या प्रमाणे प्रतिनिधीची आळीपाळीने नेमणूक करावी. |
| ङ . | | विशेष निमंत्रित- क्षयरोगापासून बरा झालेला रुग्ण /युवा प्रतिनिधी आणि ज्यानी एक/दोन मुलांनंतर नसबंदी केले असल्यास असा "कोणताही पुरुष" |
| | | एकूण सदस्य संख्या १८ ते २० पर्यंत असू शकते. |

## (ब) आयुष्यमान आरोग्य मंदिर प्राथमिक आरोग्य केंद्रस्तरावरील जन आरोग्य समितीची रचना :-

| अ.क्र. | पद | समिती |
|---|---|---|
| १. | चेअरमन/अध्यक्ष | संबधित कार्यक्षेत्रातील जिल्हा परिषद सदस्य.<br>संबंधित कार्यक्षेत्रात एका पेक्षा अधिक जिल्हा परिषद सदस्य कार्यरत असल्यास समितीचे अध्यक्ष नियुक्तीकरीता जास्तीची लोकसंख्या असलेल्या मतदार संघातून निवडून आलेले लोकप्रतीनिधी हा निकष लागू राहील. समिती अध्यक्ष निवडीचा कार्यकाल हा किमान २ वर्ष राहील.<br>* निवडणूकी अभावी जिल्हा परिषद सदस्य पद रिक्त असल्यास अथवा आदर्श आचारसंहिता कालावधीत सहअध्यक्ष हे अध्यक्ष म्हणून कामकाज पाहतील. |
| २. | उपाध्यक्ष- | उर्वरित इतर जिल्हा परिषद सदस्य उपाध्यक्ष म्हणून भूमिका बजावतील . |
| ३. | सहअध्यक्ष - | तालुका आरोग्य अधिकारी / तालुका वैद्यकिय अधिकारी. |
| ४. | सदस्य सचिव | आयुष्यमान आरोग्य मंदिर प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकिय अधिकारी /प्रभारी वैद्यकीय अधिकारी. |
| ५. | पदसिध्द सदस्य- | |
| क . | | कार्यक्षेत्रातील पंचायत समिती सदस्य |
| ख . | | प्रभारी वैद्यकीय अधिकारी/प्राथमिक आरोग्य केंद्राचे आयुष वैद्यकीय अधिकारी पैकी एक. |
| ग. | | वरिष्ठ स्टाफ नर्स /महिला आरोग्य कर्मचारी /ए.एन.एम |
| घ. | | ग्रामपंचायत आरोग्य उपसमिती सभापती (ग्रामपंचायत सदस्य) |
| च. | | महिला व बाल विकास विभाग (DWCD) /ICDS) क्षेत्रिय पातळीवरील क्षेत्रिय पर्यवेक्षक/पर्यवेक्षिका/सुपरवायझर. |
| छ. | | सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी विभाग (PHED)/पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग (DWS) प्रतिनिधी. |
| ज. | | तालुकास्तरीय शिक्षण विभागाचे अधिकारी/प्राचार्य /मुख्याध्यापक |
| झ . | | सार्वजनिक बांधकाम विभागाचे तालुकास्तरीय अधिकारी. |
| त्र . | | प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यक्षेत्राच्या आयुष्यमान आरोग्य मंदिर उपकेद्रातील जन आरोग्य समितीचे विद्यमान चेअरमन (जे किमान ५ ते ६ प्रतिनिधी असू शकतील. ) |
| ट. | | नेहरु युवा केंद्र /युवा स्वयंसेवक क्षेत्रिय प्रतिनिधी. |

| | | |
|---|---|---|
| ठ. | | नोंदणीकृत स्वयंसेवी संस्थेचे दोन प्रतिनिधी (आरोग्य विषयक कामकाज हाताळणी करणारे प्रतिनिधी) |
| ड. | | प्राथमिक आरोग्य केंद्र हे ज्या विधानसभा कार्यक्षेत्रात समाविष्ट आहे त्या कार्यक्षेत्रातील विधानसभा सदस्यानी नामनिर्देशित केलेला एक प्रतिधिनी. |
| ६. | विशेष निमंत्रित- | |
| १. | | क्षयरोगाने बरा झालेला रुग्ण, तसेच एक अथवा दोन मुलांनंतर नसबंदी केलेला "कोणताही एक पुरुष". |
| २. | | व्ही.एच.एन.एस.सी समितीचे अध्यक्ष/सदस्य/अध्यक्ष बचत गट/युथ ग्रुप यामधील सदस्य, “जे आळीपाळीने (फिरता क्रम) नुसार सदस्य पदावर राहतील”. |
| | | एकूण सदस्यांची संख्या १८ ते २० पर्यंत राहील. |

## (३) वरील आयुष्यमान आरोग्य मंदिर उपकेंद्र व आयुष्यमान आरोग्य मंदिर प्राथमिक आरोग्य केंद्र समित्यांसाठी सर्वसाधारण सूचना -

- अशासकीय सदस्याचा पदाचा कार्यकाल दोन वर्षांचा असेल. जेणे करुन जास्तीत जास्त नागरिकांना या समितीचे प्रतिनिधीत्व करता येईल.
- इतर मान्यवर सदस्यामध्ये व्ही.एच.एन.एस.सी अध्यक्ष/सदस्य असतील, परंतू त्यांचा कार्यकाल संपुष्टात आलेला असल्यास अशा सदस्यांना जन आरोग्य समितीमध्ये सदस्य पदावर दावा करता येणार नाही.
- आयुष्यमान आरोग्य मंदिर उपकेंद्र स्तरावर जन आरोग्य समिती सदस्याची निवड करतांना संबंधित ग्रामपंचायतीच्या सभेत ठराव मान्य करुन एकात्मिक आरोग्य व कुटूंब कल्याण सोसायटी/ जिल्हा आरोग्य सोसायटीच्या मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करुन मान्यता घ्यावी.
- आयुष्यमान आरोग्य मंदिर प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावरील जन आरोग्य समिती गठीत करुन सर्व सदस्यांच्या माहितीचा प्रस्ताव तालुका आरोग्य अधिका-यांमार्फत एकात्मिक आरोग्य व कुटूंब कल्याण सोसायटी/ जिल्हा आरोग्य सोसायटीच्या मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करुन मान्यता घ्यावी.
- जन आरोग्य समिती सदस्यांच्या निवडीमध्ये आयुष्यमान आरोग्य मंदिर उपकेंद्र व आयुष्यमान आरोग्य मंदिर प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यक्षेत्रातील सर्व समुदायामधील चांगले प्रतिनिधीत्व करणारे; एकूण १/३ (एक तृतीअंश) अनुसूचित जाती/अनुसूचित जमातीं मधील प्रतिनिंधीची निवड करावी. यामध्ये महिलांना किमान ५०% प्रतिनिधीत्व असावे.
- जन आरोग्य समितीची निर्मिती/रचना/भुमिका/सदस्यांचा फोन नंबर इ. सर्व माहिती प्रसिध्द करुन उपकेंद्र क्षेत्रातील अंगणवाडी/शाळा/सरकारी कार्यालये याठिकाणी दर्शनी भागात लावण्यात यावे.

## (४) जन आरोग्य समितीची भूमिका व जबाबदारी:-

१) सर्वांसाठी गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवांची तरतूद करण्यासाठी आणि उत्तरदायित्व पार पाडण्यास जबाबदारीची खात्री करेल.
२) आयुष्यमान आरोग्य मंदिरात दिल्या जाणा-या आरोग्य सेवा ह्या सिटीझन चार्टर नुसार आहेत याची खात्री करणे.
३) जन आरोग्य समितीमध्ये विशेषत: आयुष्यमान आरोग्य मंदिर मध्ये प्रदान करण्यात आलेल्या प्रतिबंधात्मक आणि प्रोत्साहनात्मक सेवा दर्शविल्या जातील. **जसे की** -गंभीर आजार, दृष्टी, कान, नाक इ. सेवा उपलब्ध राहतील. तसेच गर्भवती महिला, स्तनपान देणारी महिला, लहान बालके, किशोरवयीन मुले आणि योग कल्याण सारख्या  शिबिरांचे आयोजन केले जाईल, यांची खात्री करणे.
४) आयुष्यमान आरोग्य मंदिरात सुरक्षित पिण्याचे पाणी, दर्जेदार पोषक आहार, कचरामुक्त परिसर, स्वच्छ शौचालये, स्वच्छ लिनन,स्वच्छ प्रतिक्षालये,योग्य सुरक्षा,जैव वैद्यकीय कचरा व नियमित कचरा यांची योग्य विल्हेवाटेची आणि देखभालीची दिशादर्शक फलके योग्य ठिकाणी असल्याची खात्री करावी.
५) आयुष्यमान आरोग्य मंदिर स्तरावर अत्यावश्यक औषधे, निदानात्मक यादीप्रमाणे उपचार मिळत आहेत, याची खात्री करणे.
६) आयुष्यमान आरोग्य मंदिरामध्ये योग्यते प्रशिक्षित अधिकारी/कर्मचारी असणे, दिशानिर्देश व सांस्कृतिक प्रोत्साहन असल्यास तेथील मैत्रीपूर्ण वातावरण सुधारण्यासाठी योग्य तो प्रतिसाद देणे.
७) आयुष्यमान आरोग्य मंदिरात दिल्या जाणा-या कोणत्याही आरोग्य सेवांसाठी कोणतीही फी आकारली जाणार नाही, याची खात्री करावी.
८) आयुष्यमान आरोग्य मंदिर स्तरावर समाजातील गरीब व असुरक्षित घटकांना मोफत आरोग्य सेवा मिळण्यासाठी कोणत्याही अडचणी येऊ नये व त्यांना त्यांच्या भेटीच्या वेळी सेवा नाकारली जाणार नाही, याची खात्री करावी.
९) आयुष्यमान आरोग्य मंदिर स्तरावर सोशल मीडिया आणि डिजिटल संप्रेषणाच्या वापरास प्रोत्साहित करणे. तसेच होणा-या गुंतागुंती आणि पुन्हा दाखल करण्याचा धोका कमी करण्यासाठी रुग्णालयातून डिस्चार्ज  घेतलेल्या रूग्णांची गृह /समुदाय पातळीवरील भेटी देऊन पाठपुरावा सुनिश्चित करावा.
१०)आयुष्यमान आरोग्य मंदिरामध्ये सुविधा निश्चित केलेल्या गुणवत्ता विषयक मानके परिपूर्ण करण्यासाठी  नियमित आढावा घेणे व त्यावर देखरेख ठेवणे.

## (५) जन आरोग्य समित्यांची कार्ये :-

१. सामाजिक आणि पर्यावरणीय निर्धारकांवरील बहु-क्षेत्रिय कार्यक्रमाचे नियोजन आणि त्यास समर्थन करणेसाठी एक व्यासपीठ म्हणून समिती काम करेल.
२. क्षेत्रिय पातळीवर वार्षिक आरोग्य दिनदर्शिका दिवस साजरा करणेस, ग्राम आरोग्य पोषण पाणीपुरवठा व स्वच्छता समिती सदस्याना सहकार्य करणे.

३. विविध आजारांच्या सनियत्रंणासाठी नियोजित राष्ट्रीय कार्यक्रमाची अंमलबजावणी सामुदायिक पातळीवर करणे.
४. स्थानिक महिला गट / बचत गट / शेतकरी गट / सांस्कृतिक गट / महिला आरोग्य समिती/दूध विक्री संघ आणि इतर संघटनांचा सहभाग घेणे त्यात लिंग समानता, महिलाच्या आरोग्य विषयक समस्या निवारणास प्रोत्साहन देणे, निरोगी जीवनशैलीचा अवलंब करणे व अंमली पदार्थ सेवनावर प्रतिबंध घालणे.
५. रेडिओ, सोशल मीडिया इ.चा अधिकतम वापर करुन आरोग्य व आर्थिक जोखीमे वरील रक्षणासाठी विविध शासकिय योजनेअंतर्गत येणा-या सेवा व हक्क याबद्दल जागरूकता निर्माण करणे.
६. सामाजिक उत्तरदायित्व अनुषंगाने जनतेमार्फत प्राप्त तक्रारीचे निवारण करण्यास प्रोत्साहन देणे.

## (६) जन आरोग्य समितीची बैठक :-

१) आयुष्यमान आरोग्य मंदिर जन आरोग्य समिती सदस्य कार्यकारणीची सभा २ महिन्यातून एकदा या प्रमाणे वार्षिक ६ बैठकांचे आयोजन करावे.
२) जन आरोग्य समितीचे सदस्य सचिव हे बैठकीचे आयोजन करतील. सभेच्या दिवसाची तारीख, वार व वेळ इ. सर्व मान्यवर सदस्यांना प्रारुप अजेंडासह किमान सात दिवस आगोदर (लेखी/तोंडी) सूचना कळवतील. सभेविषयीची स्पष्ट माहिती प्रत्येक सदस्यापर्यंत पोहोचवली जाईल याची खात्री सदस्य सचिवांनी करावयाची आहे.
३) सभेसाठी किमान ५०% समिती सदस्यांची उपस्थिती कोरम आवश्यक असेल.
४) जन आरोग्य समितीची बैठक सुरु करण्यासाठी पुरेसा कोरम उपलब्ध नसेल, तर ती बैठक स्थगित करावी. कोरम भरुन काढण्यासाठी इतर सदस्यांच्या सोयीच्या वेळानुसार त्याचदिवशी एक सुचना पत्रक काढून बैठक आयोजित करावी.
५) बैठकीच्या कार्यक्रम पत्रिकेनुसार ५० टक्के गणसंख्या उपलब्ध नसली तरी पुन्हा बैठक घेतली जाईल. परंतु, लागोपाठ मागील दोन बैठका ह्या ५० टक्के कोरम अभावी आयोजित केली असेल, तर तिस-या बैठक आयोजनावेळी ५० टक्के कोरम असल्याशिवाय बैठक आयोजित करता येणार नाही.
६) दुस-यावेळी बैठकीचे आयोजन करतांना ५० टक्के गणसंख्येशिवाय तातडीच्या गरजा व सामान्य स्वरुपाच्या बाबी याआधारे निर्णय व मान्यता (आधीच्या बैठकीत मान्य केलेल्या धोरणेनुसार) घेता येतील.
७) नवीन उपक्रमे व नवीन खर्चाच्या बाबींकरीता धोरणात्मक निर्णय किंवा मान्यता घेतांना ५० टक्के कोरम असलेल्या बैठकीत निर्णय घेता येईल.
८) प्रत्येक बैठकीत कोरम पूर्ण करण्याकरीता प्रत्येक सदस्यांनी प्रयत्न करणे आवश्यक आहे. जेणे करुन इतर मान्यवर सदस्यांना देखील बैठकीस उपस्थित राहणे शक्य होईल.

९) जन आरोग्य समिती ही आर्थिक वर्षाच्या शेवटच्या बैठकीत चालू वित्तीय वर्षात केलेल्या कामकाजाचा आणि झालेल्या खर्चाचा लेखा अहवाल/वार्षिक अहवाल सादर करेल.

१०) त्यानंतर पुढील वर्षासाठी कृती आराखडा (नियोजन) तयार करेल. यासाठी एक पर्यवेक्षण यंत्रणा म्हणून समिती कामकाज करेल.

११) आयुष्यमान आरोग्य मंदिर उपकेंद्र व आयुष्यमान आरोग्य मंदिर प्राथमिक आरोग्य केंद्रात मागील वर्षाचा भौतिक व आर्थिक अहवाल पुढील आर्थिक वर्षाच्या माहे एप्रिलमध्ये समितीच्या बैठकीत सादर करुन मंजूरी घेण्यात यावी.

१२) प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर यापुर्वी ज्या ठिकाणी रुग्ण कल्याण समिती अस्तित्वात आहे अशा ठिकाणी सदर समितीची तातडीची बैठक बोलावून समितीच्या बँक खात्यात शिल्लक रक्कमेबाबत खर्चासाठी समितीचे अध्यक्ष व सदस्य सचिवांनी निर्णय घेऊन सभेची मंजूरी घेण्यात यावी. त्यानुसार इतिवृत्तात ठराव नोंदवून शिल्लक निधी १०० टक्के खर्चाचे नियोजन करावे. झालेल्या खर्चाचा पुर्तता अहवाल/लेखापरिक्षण अहवाल/SoE, UC आगामी लेखापरिक्षण करतेवळी लेखापरिक्षकांकडून पुर्ण करुन घेण्याची जबाबदारी समिती सदस्य सचिवाची राहील.

१३) दरवर्षी माहे एप्रिल व मे महिन्यात विविध योजना आखण्याचे नियोजन सुचविले पाहिजे, जेणे करुन आरोग्य व स्वच्छता विषयक नियोजनाचे प्रश्न संबंधित ग्रामपंचायतीच्या वार्षिक नियोजन प्रक्रियेत सादर करता येतील.

१४) प्रत्येक प्रस्तावित उपक्रमे आणि त्यावरील खर्चास बैठकीत उपस्थित किमान २/३ (दोन तृतीअंश) सदस्यांची मान्यता घ्यावी. मागील सभेपासून हाती घेण्यात आलेली सर्व उपक्रमे, त्यावरील झालेला खर्च सादर करुन बैठकीत मंजूरी घ्यावी. बैठकीत सादर केलेले सर्व प्रस्ताव उपस्थित सर्व सभासदांनी आपल्या एक मताने किंवा होकार दर्शवून आपली मते नोंदवून मान्यता घ्यावी.

१५) जन आरोग्य समितीच्या प्रत्येक सभेच्या इतिवृत्ताची नोंद ठेवली जाईल. मागील महिन्यात झालेल्या उपक्रमाचे लेखांकन, खर्चाचे दस्तऐवजीकरण आयुष्यमान आरोग्य मंदिर उपकेंद्र व आयुष्यमान आरोग्य मंदिर प्राथमिक आरोग्य केंद्रात केले जाईल.

१६) प्रत्येक आयुष्यमान आरोग्य मंदिर उपकेंद्राच्या बैठकीत संबंधित व्ही.एच.एस.एन.सी (AAM-SC अंतर्गत) च्या बैठकीत उपस्थित झालेल्या त्रृटीच्या मुद्द्यांविषयी आणि त्यांच्याव्दारे हाती घेतलेल्या उपक्रमाचे सर्व मुद्दे चर्चेसाठी ठेवले जातील.

१७) आयुष्यमान आरोग्य मंदिर उपकेंद्र व आयुष्यमान आरोग्य मंदिर प्राथमिक आरोग्य केंद्रात जन आरोग्य समितीच्या प्रत्येक बैठकीत नियमित विषयसूची व्यतिरिक्त इतर आवश्यक विषय चर्चेस आणले पाहीजे.

## (७) जन आरोग्य समितीचा अबंधीत निधी:-

- केंद्र शासनाकडून आयुष्यमान आरोग्य मंदिर उपकेद्राकरीता रु.५०,०००/- आणि आयुष्यमान आरोग्य मंदिर प्राथमिक आरोग्य केंद्रास रु.१,७५,००० /- इतक्या वार्षिक

अबंधीत निधीची तरतूद करण्यात येते. केंद्राकडून अबंधीत निधी वितरणाचे निकष निश्चित आहेत. त्यामुळे प्रकल्प अंमलबजावणीच्या मंजूरीच्या अधिन राहून टप्याटप्याने निधी वितरित केला जातो.

- अंबधीत निधी हा लवचिक (Flexipool) निधी असून जन आरोग्य समितीच्या पातळीवर घेतलेल्या निर्णयाच्या आधारे आरोग्य संस्थेतील अत्यावश्यक गरजा पूर्ण करण्यासाठी या अबंधीत निधीचा उपयोग करता येईल.
- रूग्णांना व नागरिकांना मूलभूत सेवांसुविधाची खात्री करुन देणे. तसेच समुदायस्तरावर आरोग्य संवर्धनास मदत करणे, अशी अबंधीत निधीतून खर्चास प्राधान्य देणारी दोन स्तंभे आहेत. या मुलभूत तत्वाचे पालन करुन स्थानिक गरजा व प्राधान्यक्रम ठरवून त्यावर आधारित खर्च होणे अपेक्षित आहे.
- अबंधीत निधी हा व्यक्तीगत गरजांसाठी नसून आपत्कालीन परिस्थितीत सर्व सामान्याच्या हितासाठी वापरला गेला पाहिजे.
- आपत्कालीन परिस्थितीत संदर्भ आणि वाहतुकीच्या बाबी वगळता केवळ निराधार महिलेस त्वरित आरोग्य सेवा देणे आवश्यक असल्यास (गरीब, वयोवृद्ध, दिव्यांग) त्यांच्याकरीता तातडीच्या आरोग्य सेवा देण्यासाठी रु. ५००/- पर्यंत इतका निधी वापरता येईल.
- जन आरोग्य समितीने अशा गरजा पुर्ण करण्यासाठी स्थानिक समुदायामार्फत संसाधने /देणग्या स्विकारणे, योगदान दिलेल्या व्यक्ती/संस्थांची नोंद घेऊन आरोग्य विषयक प्रोत्साहन दिन व वार्षिक जनसंवादाच्या दिनी अथवा सामाजिक उत्तरदायित्व कार्यक्रमाच्या दिवशी त्यांचा सत्कार/सन्मान करता येईल.
- नियमित आरोग्य सेवा पुरवठयामध्ये खंड पडल्यास अथवा तातडीच्या गरजा भागविण्यासाठी तसेच संस्था देखभाल/औषधी/वैद्यकिय उपकरणे/साहित्ये इ.खरेदीसाठी अबंधीत निधीचा वापर करता येईल.
- खरेदी करण्यात आलेल्या औषधी/वैद्यकिय उपकरणे/साहित्ये ही राज्य शासनाने प्रसिध्द केलेल्या मुळ अत्यावश्यक यादीतील एक भाग असणे आवश्यक आहे.

## (८) अबंधित निधीच्या खर्चाच्या बाबी:-

१) मनुष्यबळाच्या खर्चाव्यतिरिक्त आरोग्यवर्धिनी उपकेंद्राच्या/प्रा.आ.केंद्राच्या परिसर स्वच्छतेसाठी लागणा-या उपयोग्य वस्तूंशी संबंधित खर्च. (झाडु, खराटा, टिकाव, पाटी इ.)

२) प्रसाधनगृहातील स्वच्छ वातावरण निर्मितीसाठी खर्च. (फिनेल, ब्लिचिंग पावडर, हॅंडवॉश इ.)

३) सेप्टिक टाक्या / शौचालयांच्या किरकोळ दुरुस्तीशी संबंधित खर्च.

४) रूग्णांना शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्यासंबंधित खर्च.

५) दिशादर्शक फलके/चिन्हाशी संबंधित खर्च.

६) कचरा विल्हेवाट व्यवस्थापनाशी संबंधित खर्च.

७) आरोग्यविषयक प्रोत्साहन दिवस आणि लोक कल्याणकारी उपक्रम (उपकरणे खरेदी वगळता) आयोजित करण्यासंबंधित खर्च.

## (९) अबंधीत निधीतून खालील बाबींवर खर्च करण्यात येऊ नये :-

१) नियमित देखभाल व दुरुस्तीकरीता निधी अथवा अनुदान उपलब्ध आहे असा खर्च - (दुरध्वनी, विज व पाणी बिले इ.)

२) मनुष्यबळ/व्यक्तीगत खर्च.(वाहनचालक, प्रयोगशाळा तत्रंज्ञ, सफाई कामगार इ.)

३) अत्यावश्यक यादीत समाविष्ट नाहीत अशी - औषधे, निदानात्मक साहित्ये/वैद्यकिय उपकरणे इ. वरील खर्च.

४) राज्य शासनाच्या विविध कार्यक्रमाव्दारे तरतूद केली आहे अशी वस्तू किवा उपक्रमे.

५) इमारतीचा मोकळा परिसर, बाहेरील व्यायामशाळा अथवा व्यायामाशी संबधीत उपकरणे/साधने अथवा बांधकाम इ.

## (१०) अबंधीत निधीचे आर्थिक व्यवस्थापन आणि लेखापरिक्षण:-

१) जन आरोग्य समितीचे बँक बचत खाते हे दोन व्यक्तीच्या संयुक्त स्वाक्षरीने चालविण्यात येईल. जन आरोग्य समिती गठीत केल्यानंतर समितीच्या नावे नजीकच्या बँकेत स्वतंत्र बचत खाते उघडण्याची प्रक्रिया पुढील १५ दिवसात पुर्ण करावी.

२) आयुष्यमान आरोग्य मंदिर उपकेद्र येथे यापुर्वी अस्तित्वात असलेले बँक बचत खाते जन आरोग्य समितीचे सहअध्यक्ष (वैद्यकिय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र) आणि सदस्य सचिव (CHO/ANM) यांच्या संयुक्त स्वाक्ष-या अंर्तभुत करुन बँक खात्यावरील व्यवहार चालु ठेवण्यात यावा.

३) प्राथमिक आरोग्य केंद्र येथे जन आरोग्य समिती बँक बचत खात्यावरील व्यवहार सह अध्यक्ष (तालुका आरोग्य अधिकारी) व सदस्य सचिव (वैद्यकिय अधिकारी) यांचे संयुक्त स्वाक्षरीने चालविण्यात येतील.

४) सद्यस्थितीत केंद्र व राज्य शासनाने राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत आर्थिक व्यवस्थापनाकरीता SNA SPARSH प्रणालीच्या अमंलबजावणीबाबत बंधनकारक केले आहे. त्या अनुषंगाने आयुक्तालय स्तरावरून दि. ०६/११/२०२५ च्या पत्रान्वये मार्गदर्शनपर सुचना दिल्या असून त्यानुसार कार्यवाही होणे अपेक्षित आहे. त्यामुळे राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत होणारा खर्च अग्रिम स्वरूपात न होता देयकांची अदायगी जिल्हास्तरीय स्पर्शप्रणाली माध्यमाद्वारे होणे बंधनकारक राहील. तसेच स्पर्शप्रणालीबाबत केंद्र / राज्य शासनाने भविष्यात सदर आर्थिक व्यवस्थापनात बदल सुचविल्यास तशा सुचना निर्गमित करण्यात येतील.

५) आवश्यक गणसंख्येच्या (कोरमच्या) आधारे आयोजित केलेल्या बैठकीत प्रस्तावित उपक्रमे आणि त्यावरील खर्चाच्या मंजूरीच्या आधारे गरजेप्रमाणे देयकांची प्रतिपुर्ती SNA SPARSH प्रणालीद्वारे करावी.

६) SNA SPARSH प्रणालीमध्ये अग्रिम देणी अनुज्ञेय नसल्याने असे व्यवहार तथा रोख

व्यवहार करू नयेत.

७) जन आरोग्य समितीच्या प्रत्येक बैठकीत तपशीलवार उत्पन्न आणि खर्चाचे अहवाल सादर करावेत.

८) आयुष्यमान आरोग्य मंदिर उपकेद्र व प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावरील जन आरोग्य समितीचे तिमाहीत फॉर्म १२ C (GFR 2017) मध्ये उपयोगिता प्रमाणपत्र (Utilization Certificate) समितीचे सहअध्यक्ष आणि सदस्य सचिव यांच्या संयुक्त स्वाक्षरीने सादर करावे.

९) राज्य शासनाने जारी केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार आयुष्यमान भारत अतंर्गत आरोग्यवर्धिनी केंद्राने अबंधीत निधीचे वार्षिक लेखापरिक्षण करण्यात यावे.

१०) अबंधीत निधीतून हाती घेतलेल्या उपक्रमांचा आणि खर्चाचा वार्षिक अहवाल पुढील आर्थिक वर्षाच्या एप्रिल महिन्यात जन आरोग्य समितीच्या बैठकीत सादर करावा. सदरचा वार्षिक अहवाल आयुष्यमान आरोग्य मंदिर स्तरावरील सामाजिक उत्तरदायित्वाचा एक भाग राहील.

## (११) जन आरोग्य समितीच्या अध्यक्षांची कार्ये, अधिकार व प्रमुख जबाबदा-या :-

१) समितीच्या अध्यक्षांना सर्व बैठकांच्या आयोजनाचे व त्या बैठकीचे अध्यक्षपद भुषविण्याचे अधिकार राहतील.

२) जन आरोग्य समितीने अध्यक्षांना सोपविलेल्या अधिकारांचा उपभोग घेतील.

३) समितीच्या कार्याचे व प्रगतीचा आढावा घेणे, तसेच त्या संबंधीत प्रकरणांच्या चौकशीचे आदेश देण्याचा अधिकार राहील.

४) बैठकीचे सर्व वादग्रस्त प्रश्न मतदानाव्दारे सोडविणे व समिती सदस्यामध्ये एकसंगती नसल्यास निर्णायक मतदानाचा अधिकार समितीच्या अध्यक्षांना असेल.

५) तातडीच्या गरजा भागविण्यासाठी अध्यक्ष हे सदस्य सचिवाच्या शिफारशीनुसार निर्णय घेऊ शकतात.

## (१२) जन आरोग्य समितीच्या सदस्य सचिवांचे अधिकार, कार्ये व जबाबदा-या:-

१) जन आरोग्य समितीचे सदस्य सचिव हे समितीच्या सर्व बैठका, कार्यवाही आणि ठराव नोंदवून घेतील व त्यावर कार्यवाही सुनिश्चित करतील.

२) सदस्य सचिवास दैनदिन प्रशासनाचे व्यवस्थापनाकरीता समितीच्या वतीने पत्रव्यवहार करणे, सर्व व्यवहाराच्या नोंदी ठेवणे व जंगम मालमत्ता ताब्यात ठेवण्याचा अधिकार असेल.

३) समितीच्या वतीने सर्व बीले, पावत्या, व्हाऊचर्स, करार आणि इतर महत्त्वाच्या कागदपत्रांवर स्वाक्षरी करण्याचे अधिकार असतील.

४) एखादया कार्यासाठी उपसमिती तयार करणे व त्या समितीला अधिकार सोपविणे.

५) निश्चित केलेल्या कार्यासाठी /उपक्रमासाठी आर्थिक तरतूदीचा प्रस्ताव पुढील बैठकीत सादर करुन मान्यता घेणे.

६) अध्यक्ष्यांशी सल्लामसलत करुन तातडीच्या बाबींवर कार्यवाही करुन निर्णय घेणे.

७) समितीच्या बैठकीत पर्यवेक्षीय कर्मचा-यांना उपस्थित राहणे व त्यांचे कामकाज समिती समोर सादर करण्याचे कार्य सदस्य सचिवांचे राहील.

८) आरोग्यवर्धिनी केद्रामध्ये सुविधा निश्चित केलेल्या गुणवत्ता विषयक मानके यांचा आढावा घेणे व त्यावर देखरेख ठेवणे.

## (१३) जन आरोग्य समितीच्या अंमलबजावणीसाठी महत्वपूर्ण सूचना -

१. दरवर्षी दिनांक १४ एप्रिल हा दिवस आयुष्यमान भारत आरोग्यवर्धिनी दिवस साजरा करणे.

२. आरोग्य केंद्रामधील वर्षभरात आयोजित उपक्रम, त्यावरील यश, अपयश, आव्हाने व माहितीची देवाण-घेवाण याकरीता समुदायस्तरावर दरवर्षी एक या प्रमाणे जनसंवादाचे आयोजन करणे. यामध्ये एकत्रित केलेल्या त्रुटीच्या मुद्दयांविषयी चर्चा करुन सामोपचाराने प्रश्न निकाली काढणे शक्य असल्यास गाव पातळीवर वार्षिक नियोजन आराखडयामध्ये त्यांचा समावेश करणे.

३. विविध शासकीय योजनाविषयीची माहिती व त्यावरील हक्काविषयी जागरुकता वाढविण्यासाठी रेडीओ, विविध समाज माध्यमांवर प्रचार व प्रसार करणे.

४. आरोग्य संस्थेच्या ठिकाणी नाविण्यपुर्ण योजनांवर भर देऊन उपक्रम यशस्वीरित्या पुर्ण करणे.

५. आपात्कालिन परिस्थितीत झालेल्या खर्चाची मान्यता पुढील बैठकीत प्रस्ताव सादर करुन कार्योत्तर मान्यता घेणे अनिवार्य आहे.

६. आयुष्यमान भारत अतंर्गत आरोग्यवर्धिनी आरोग्य विषयक प्रचार (Health Promotion) हे एक प्रमुख कार्य आहे. यात आरोग्य संवर्धन, जीवनशैलीमधील बदल आणि प्रतिबंधात्मक पद्धतींची योग्य प्रक्रिया सुरु करणे व त्यास चालना देणे याचा समावेश असेल.

७. अबंधीत निधीतून अनुज्ञेय असलेल्या खर्चाच्या विविध बाबींमध्ये इष्टतम नियंत्रण राखले गेले पाहिजे. जसे की - अ) आरोग्यवर्धिनी केंद्र परिसराची देखभाल, (ब) रुग्णसुविधा क) आयुष्मान भारत आरोग्यवर्धिनी केंद्राच्या पायाभूत सुविधांची देखभाल. अशा प्रत्येक श्रेणीमध्ये किमान २०% खर्चाच्या मर्यादा निश्चित करण्याचा निर्णय घेऊ शकतात, परंतु स्थानिक गरजेनुसार त्यांमध्ये लवचिकता/फेरबदल करता येईल. मात्र कमाल खर्चाची मर्यादा ही PIP च्या मंजूर तरतुदीच्या मर्यादेत असावी.

८. समितीची बैठक रचनात्मक असावी. बैठकीचा अजेंडा एकसुत्री असावा, आवश्यकता भासल्यास अध्यक्ष हे सदस्य सचिवा सोबत विषयसूचीवर चर्चा करतील.

९. समितीच्या बैठकीत आरोग्य केद्रांच्या प्रगतीचा आढावा, वार्षिक नियोजन, प्रशासकिय बाबी यावर चर्चा करतील.

१०.जन आरोग्य समितीच्या बैठकीचे आयोजन करण्यासाठी जास्तीत जास्त रुपये ४००/- (अक्षरी रुपये चारशे फ़क्त) (चहा/नाश्ता/इतिवृत्त छायाकंन करणे इ. करीता) पर्यंत प्रती बैठक याप्रमाणे स्पर्श प्रणाली अंतर्गत प्रतिपुर्ती पद्धतीने खर्च करता येईल.

११. बँक खात्याचा व्यवहार सहअध्यक्ष व सदस्य सचिव यांच्या संयुक्त स्वाक्षरीने चालविण्यात येईल.

१२.अभियानांतर्गत सर्व देयकांची अदायगी ही SNA SPARSH प्रणाली माध्यमातुनच अदा करावी तथा अभियाना व्यतिरीक्त देयके ही चेक/डिमांड ड्राफ्ट /नेट बॅकींग /डिजीटल बॅकींग याव्दारे रक्कम अदा करता येतील.

१३.तातडीच्या प्रसंगी घेतलेल्या निर्णयाबाबत समितीच्या पुढील बैठकीत सादर करुन कार्योत्तर मान्यता घेण्यात यावी.

१४. प्रत्येक सभेच्या कामकाजाचे इतिवृत्त सभा संपुष्टात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर समिती सदस्याना इतिवृत्त सादर करणे अनिवार्य राहील.

१५. सदस्य सचिवांनी समितीच्या बैठकाशी संबधीत नोंदी, भौतिक व आर्थिक बाबीच्या नोंदी, दस्ताऐवजाचे इ. जतन करणे आवश्यक आहे.

१६.केंद्र शासनाकडील मार्गदर्शक पुस्तिकेत सविस्तर माहिती दर्शविण्यात आलेली असून या पुस्तिकेच्या आधारे क्षेत्रिय पातळीवर योजनेची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०८०५१५५२१३५८१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

KAILAS TARACHAND SALUNKE

Digitally signed by KAILAS TARACHAND SALUNKE
DN: cn=KAILAS TARACHAND SALUNKE, o, ou, email=kailas.salunke@nic.in, c=US
Date: 2026.08.05 16:33:25 +05'30'

(कैलास साळुंके)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत :-**

१) प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
२) प्रधान सचिव, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
३) जिल्हाधिकारी, जिल्हा कार्यालय, सर्व
४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व
५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी, ग्रामपंचायत जिल्हा परिषद, सर्व
६) प्रकल्प अधिकारी, महिला व बाल विकास विभाग, सर्व
७) उपसंचालक, परिमंडळ कार्यालय, सर्व.
८) जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व
९) तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती सर्व